अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि.१४ जानेवारी २०२४ | ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : ९६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## शेअर गुंतवणूक; मंगळवेढा येथील डॉक्टरास १९ लाखास गंडविले

**सोलापूर** : शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास ३० टक्के परतावा देतो, असे सांगून एका डॉक्टरास १९ लाख २० हजाराची फसवूून केल्याची घटना मंगळवेढ्यात उघडकीस आली. या संदर्भात डॉ. महेश महादेव कोनळळी यांनी नुकतीच पोलिसात फिर्याद दाखल केली. दि. ९ डिसेंबर २०२२ रोजी दोघा अनोळखी इसमांनी त्यांना मोबाईलवरून संपर्क साधला. एली ॲपमधील शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास तुम्हाला ३० टक्के परतावा देतो, असे सांगितले. त्याप्रमाणे डॉक्टरांनी ॲपच्या माध्यमातून त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या बँक खात्यातून डिसेंबर २०२३ या दरम्यान एकूण १९ लाख २० हजार रुपये पाठवले होते. मात्र परतावा, मुद्दल मिळाली नाही. आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर डॉ. महेश यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.

## ज्येष्ठ शास्त्रीय गायिका प्रभा अत्रे यांचे निधन



**मुंबई** : ज्येष्ठ शास्त्रीय गायिका प्रभा अत्रे यांचे पुण्यातील राहत्या घरी निधन झाले आहे. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. त्यांच्या निधनाने संगीतक्षेत्राला धक्का बसला आहे. प्रभा अत्रे 'स्वरप्रभा' या कार्यक्रमात गायन करण्यासाठी पुण्याहून मुंबईला जाणार होत्या. मुंबईत त्यांच्या गायनाचे आयोजन करण्यात आले होते. वयाच्या ९२ वर्षी देखील त्या गाणं गात होत्या. आणि सार्वजनिक कार्यक्रमांना उपस्थित राहत होत्या. पहाटे झोपेत असताना प्रभा अत्रे यांना हृदयविकाराचा झटका आला. नातेवाईक अमेरिकेत असल्याने ते भारतात आल्यावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# महायुतीच्या भोवती भ्रष्टाचाराचे वादळ

- रूग्णवाहिका टेंडरमध्ये ८ हजार कोटींचा घोटाळा
- फडणवीसांच्या ओएसडींकडून वारेमाप खर्च

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**अपात्र प्रकरणाच्या निकालानंतर आपल्या सत्तेची खुंटी मजबूत झाल्याचा धुंदीत असलेल्या महायुती सरकारच्या भोवती भ्रष्टाचाराचे वादळ घोंगावत आहे. आपले सरकार साधनशूचितेचे आहे. एका पैशाचाही भ्रष्टाचार नाही, असे महायुतीचे नेते छातीठोकपणे सांगत असतात पण आता भ्रष्टाचाराचे आरोप होवू लागल्यानंतर त्यावर सरकारला स्पष्टीकरण द्यावेच लागेल. राज्यात शासकीय रूग्णवाहिका खरेदीत आठ हजार कोटींचा टेंडर घोटाळा झाल्याचा गौप्यस्फोट काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे आ. रोहित पवार यांनी मंत्र्यांच्या दौऱ्यावरील वारेमाप खर्च आणि नोकर भरतीच्या परीक्षेत होणाऱ्या घोटाळ्यावरून सरकारवर टीका केली आहे. या आरोपांमधुळे महायुतीमध्ये खळबळ उडाली आहे. यात एक धक्कादायक बाब म्हणजे रूग्णवाहिका घोटाळ्यात एका आयएएस अधिकाऱ्याचा हात असल्याची माहिती पुढे आल्याने मंत्रालय देखील चक्रावून गेल्याच सांगण्यात येते.**

वडेट्टीवार हे शनिवारी नागपूरच्या दौऱ्यावर होते.त्यावेळी पत्रकार परिषद निमंत्रित करून रूग्णवाहिकेच्या खरेदीत घोळाळा झाल्याची माहिती दिली. हे टेंडर सरकारला रद्द करावे लागेल, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. ही मागणी सरकारने मान्य केली नाही, तर या सरकारमध्ये सर्वच लाभार्थी असतील, असा संशय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. राज्यभरातील गरीब आणि गरजू रुग्णांसाठी आधार ठरलेल्या सरकारी ॲम्ब्युलन्समधून (१०८) वारेमाप पैसा कमाविण्याची शक्कल शिंदे-फडणवीस-पवार सरकारमधील काही मंडळींनी लढवली आहे. वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांना 'बदली'ची भीती दाखवून ॲम्ब्युलन्सचे साडेतीन-चार हजार कोटींपर्यंतच्या टेंडर तब्बल ८ हजार कोटींपर्यंत फुगवल्याचेही यातून उघड-उघड दिसत आहे, असे त्यांनी सांगितले.



### विदेशी दौऱ्यावर १ कोटी ८८ लाखांचा खर्च

रोहित पवार यांनी मंत्र्यांच्या विदेशी दौरे आणि राज्यातील नोकर भरतीच्या परीक्षेत होणाऱ्या घोटाळ्यावरून सरकारवर मुंबईत बोलताना टीका केली. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर काही गंभीर आरोप केले आहेत. फडणवीसांच्या ओएसडीच्या अनेक कंपन्या असून, त्यांच्या संबधित कंपन्यांना परीक्षेचे कामे मिळत आहेत. तसेच, फडणवीसांच्या ओएसडीच्या एका विदेशी दौऱ्यावर १ कोटी ८८ लाखांचा खर्च झाला असल्याचे देखील पवार म्हणाले.

### सूत्रधार कोण? अधिकारी रडारवर



सरकारी ॲम्ब्युलन्समधून (१०८) वारेमाप पैसा कमाविण्याचे आठ दिवसांचे टेंडर काढणारे अधिकारी धीरजकुमार आता थेट विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या रडारवर आले आहेत. मंत्र्यांच्या नातेवाईकाला देण्यासाठी हे टेंडर काढल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. या टेंडर प्रक्रियेला आमचा विरोध असून मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार करणार असून चार हजार कोटींच्या कामाचे आठ हजार कोटी कसे लागतात? असा प्रश्नच त्यांनी उपस्थित केला आहे. आठ दिवस एवढ्या शॉर्ट नोटीसवर टेंडर काढल्याचे आश्चर्य वडेट्टीवार यांनी व्यक्त केले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



उद्या येतील परत 'गोड बोला' म्हणायला !

कल्याण
290-12-345



### एकदा भक्तलिंगऽऽ हर्र बोला हर्रऽऽ

श्री सिध्देश्वर महाराज की जयच्या जयघोषात शनिवारी सकाळी उत्तर कसब्यातील हिरेहब्बू यांच्या वाड्यातून पूजेनंतर मानाच्या नंदीध्वजांची मिरवणूक काढण्यात आली.

